वाचले :-

१) जा.क्र.माविपिंसौ/०१/कावि/३६४/२०२१ दि.२३/०८/२०२१.

२) माध्य/शि/०२/कावि/५२८/२०२१ दि.१३/१०/२०२१.

३) श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांचे दि.२९/११/२०२१ चे पत्र.

४) दि.२८ /०७/२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग,
माध्य/शि/०१/कावि/५२८ /२०२२
दिनांक-२८ /०७/२०२२

विषय – सक्त ताकीद देणेबाबत....
श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक

आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय पिंपळे सौदागर या विद्यालयात श्री.नंदू शिवराम जगताप, हे सहाय्यक शिक्षक या महत्वाच्या व जबाबदारीच्या पदावर कामकाज करत आहेत. श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे. श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक विद्यालयात दि.२९/११/२०२० ते दि.२९/११/२०२१ या दिर्घ कालावधीसाठी विनापरवाना गैरहजर असल्याचे दिसुन आलेले आहे. माहे-जानेवारी-२०२१ ते फेब्रुवारी -२०२१ या कालावधीत कोरोना -१९ या साथरोगामुळे विद्यालयातील इ. ०५वी वी ते ०९ वी पर्यत विद्यार्थ्यांना सुट्टी देणेत आलेली होती. तथापी विद्यार्थाचा ऑनलाईन अभ्यासक्रम घेणे क्रमप्राप्त होते.तसेच इ.१० वी चे विद्यार्थ्यांच्या बोर्ड परिक्षा माहे एप्रिल २१ मध्ये घेणेत आलेल्या होत्या. त्यांचा अभ्यास क्रम तसेच सराव घेणे आवश्यक असताना, श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक विद्यालयात विनापरवाना गैरहजर राहिलेले आहेत.त्यांच्या या बेशिस्त वर्तनामुळे विद्यालयातील विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे.तसेच श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांचे घरबांधणी कर्जाच्या रक्कमेच्या अपहाराबाबत कारवाई चालू आहे.सदर बाब शैक्षणिक दृष्ट्या अतिशय गंभीर स्वरूपाची आहे, याबाबत श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांना वेळोवेळी ज्ञापन/नोटिस देणेत आलेले आहे. त्याबाबत श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक खुलासा सादर करणेत आलेला आहे.तसेच श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यापुढे विनापरवाना गैरहजर राहणार नाही असे हमीपत्र ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिल्यामुळे श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक कामकाज अहवाल समाधानकारक असल्याने सदरचा खुलासा एकवेळेस फक्त रजेकरीता मान्य करणेत येत आहे.

तरी श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांना या आदेशान्वये सक्त ताकीद देणेत येते की यापुढे कार्यालयीन / शैक्षणिक कामकाजात हलगर्जीपणा केल्यास श्री.नंदू शिवराम जगताप,सहाय्यक शिक्षक यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका कलम-५६(२) अन्वये नियमाधिन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रति,
श्री.जगताप नंदू शिवराम सहा.शिक्षक
माध्ममिक विद्यालय पिंपळे सौदागर
प्रत,
मुख्याध्यापक,मा.वि. पिंपळे सौदागर
सदरचा आदेश श्री.जगताप नंदू शिवराम सहा.शिक्षक यांना बजाउन पुर्तता अहवाल सादर करणेत यावा.